**प्रेस नोट** **दि.२३/०३/२०१९**

## येरवडा पोलीस स्टेशन पुणे शहर

## नवघर पो.स्टे.मुंबई येथील गुन्ह्यातील १४ वर्षांची अपहृत अल्पवयीन मुलगी व सज्ञात २ आरोपींचा काही वेळातच शोध घेऊन त्यांना नवघर पो.स्टे.कडील पोलीसांचे ताब्यात दिले.

दिनांक २०/०३/२०१९ रोजी रात्रौ २०:०० वा.चे सुमारास नवघर पोलीस स्टेशन, मुंबई पो.उप.निरी.श्री.पिलाणे यांनी येरवडा पो.स्टे.येथे फोन करून कळविले की, नवघर पो.स्टे. गु.र.नं. ५९/२०१९ भा.दं.वि.क. ३६३,३४ या मधील १४ वर्षांचे अल्पवयीन मुलीस २ संशयित आरोपी हे खाजगी बसमधून पळवून घेऊन जात असून येरवडा पो.स्टे. हद्दीतील खाजगी बसेस थांबणारी ठिकाणे चेक करून मुलगी व दोन आरोपी मिळून आल्यास त्यांना ताब्यात घेणेबाबत कळविले.

सदरची माहिती मिळताच श्री.राजेंद्र कदम, वरिष्ठ पोलीस निरीक्षक यांनी तात्काळ रात्रपाळीचे अधिकारी स.पो.निरी.श्री.सुशिल बोबडे व लक्ष्मीनगर बीट मार्शलचे पो.कर्मचारी पो.ना. ६६८६ विठ्ठल खेडकर व पो.शि. ८२६७ संजय सकट यांना सदरची माहिती देऊन, अपहृत मुलीचा व आरोपींचा शोध घेणेकामी मार्गदर्शक सूचना दिल्या. त्याप्रमाणे स.पो.नि. बोबडे व बीट मार्शलचे पो.कर्मचारी पो.ना.६६८६ खेडकर व पो.शि. ८२६७ सकट यांनी पो.स्टे.हद्दीतील संगमवाडी खाजगी बसेस पार्कींगचे ठिकाणी जावून मुंबईवरून पुण्यास येणाऱ्या लक्झरी बसेस व मुंबई येथून संगमवाडी येथे येऊन इतर ठिकाणी जाणाऱ्या लक्झरी बसेस यांची तपासणी केली असता, संगमवाडी लक्झरी बसेसचे थांब्याचे ठिकाणी मुंबई ते बुलढाणाकडे जाणाऱ्या खाजगी लक्झरी बसमध्ये, सदरची १४ वर्षांची अपहृत मुलगी व आरोपी नामे- (१) देवानंद ऊर्फ नंदू मोरे, वय २१ वर्षे, (२) विनोद सुभाष मोरे, वय २३ वर्षे, दोघे रा. बुलढाणा हे मिळून आले. महिला पोलीस कर्मचारी यांचेकरवी सदर मुलीस तसेच आरोपींना येरवडा पो.स्टे.येथे आणण्यात आले. त्यानंतर पहाटे च्या सुमारास वरील नमूद गुन्ह्याचे तपासी अधिकारी श्री.एस.एन.पिलाणे, नवघर पो.स्टे.मुंबई हे येरवडा पो.स्टे.येथे त्यांचे पथकासह आल्याने, सदर अपहृत अल्पवयीन मुलीस व दोन्ही आरोपींना त्यांचे ताब्यात देण्यात आले आहे.

अशा प्रकारे येरवडा पो.स्टे.कडील श्री.राजेंद्र कदम, वरिष्ठ पोलीस निरीक्षक, श्री. सुशिल बोबडे, सहा.पो.निरी., बीट मार्शलचे कर्मचारी पो.ना. ६६८६ विठ्ठल खेडकर व पो.शि. ८२६७ संजय सकट यांनी मिळालेल्या माहितीवरून अपहृत १४ वर्षांचे अपहृत मुलीचा व आरोपींचा शोध घेऊन त्यांना नवघर पो.स्टे.चे संबंधीत तपासी अधिकारी यांचे ताब्यात देऊन उल्लेखनिय कामगिरी केलेली आहे.

**(राजेंद्र कदम)**
वरिष्ठ पोलीस निरीक्षक,
येरवडा पोलीस स्टेशन, पुणे